# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९०००७

E- mail : desk12@dte.org.in/12desk@gmail.com web : http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक : १२/आस्था/(१)/२०१६/३१०२

दिनांक - 4 NOV 2016

प्रति,

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 10 NOV 2016 आवक क्र. 13530

विषय :- गट क व गट ड संवर्गातील पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यासंदर्भात

संदर्भ :- १) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पदनि २०१०/८४/१०/विसु-१, दिनांक : २७/०९/२०१०

२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पदनि २०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दिनांक : ०२/०२/२०१३

३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पदनि २०१३/प्र.क्र.११२/१३/ वित्तीय सुधारणा-१, दिनांक : ०२/१२/२०१३

४) संचालनालयाचे पत्र क्र. १२/आस्था(१)/२०१२/४६६१, दि.११/०१/२०१३

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये/अधिनस्त संस्थांमध्ये तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या /अस्थायी/ कार्यालयाचे स्तरावर कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्ध करुन घेतल्या जातात, सदरच्या सेवा नोंदणीकृत एजन्सी मार्फत घेतल्या जात नाही, तसेच अखंड सुरु ठेवल्या जातात अशा रोजंदारीवरील कर्मचा-यांच्या नियुक्त्या दिर्घकाळ चालू राहिल्यामुळे संबंधित कर्मचारी त्यांना सेवेत कायम करण्याची मागणी करतात व त्यांची मागणी मान्य न केल्यामुळे ते मा.औद्योगिक न्यायालयात/कामगार न्यायालयात/महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात /मा.उच्च न्यायालयात दावे दाखल करतात. तसेच सेवा नियमित करण्याबाबत संबंधित कर्मचा-यांकडून सतत शासनाकडे / या कार्यालयाकडे पत्रव्यवहार होत असतो. त्यामुळे **अशा कार्यालयाचे स्तरावरील स्वतः कंत्राटी पध्दतीने घेण्यात आलेल्या सेवा न घेण्याबाबत यापूर्वीच संचालनालयाच्या संदर्भिय क्र.४ च्या पत्रांन्वये सर्व विभागीय कार्यालयांना सूचित करण्यात आलेले आहे,** तथापी अद्यापही अशाप्रकारे विभागीय कार्यालयाचे / संस्थांच्या स्तरावरुन कंत्राटी पध्दतीने ज्या सेवा चालू असतील तर, **त्या तात्काळ बंद करण्यात याव्यात.** अन्यथा याबाबत भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुख/कार्यालय प्रमुखाची राहील.

वरील संवर्गातील पदांच्या सेवा हया कंत्राटी स्वरुपात घ्यावयाच्या असतील तर त्या केवळ वित्त विभागाच्या संदर्भिय क्रमांक १ ते ३ च्या परिपत्रकामधील निर्देशानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन बाहय यंत्रणेकडून (Outsourcing ) द्वारे उपलब्ध करुन घेण्यात याव्यात.

( डॉ.सुभाष महाजन )

संचालक,तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य,मुंबई

आस्था-४/३(अ)

\\192.168.1.9\desk12\Desk12-2(Patil)\rppatil\R.O.Mumbai-1-.docdesk12 Page 187 11/4/2016

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-४/कंत्राटी/२०१६/ 4608

दिनांक 16 NOV 2016

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था / कार्यालय प्रमुख.

त्यांना कळविण्यात येते की, संदर्भित पत्रामध्ये सूचित केल्यानुसार कंत्राटी सेवा नोंदणीकृत एजन्सी मार्फत घेण्यासंदर्भात दिलेल्या सूचनांचे पालन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र सहपत्रांसह या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.